-: प्रेसनोट दिनांक- ०८/०२/२०२१ :-

**मिलींद मधुकर कुलकर्णी, वय ५५, उपकोषागार अधिकारी, ता. कागल, जि. कोल्हापूर, वर्ग - २, रा. प्लॉट नं. ६९, अरूणोदय को. ऑप सोसायटी, शाहु पार्क, राजेंद्र नगर, कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.........**

---

ग्रामीण रूग्णालय, मुरगूड यांनी लॉकडाऊन काळात रूग्णालयास आवश्यक औषधांची मा. वैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्याने स्थानिक विक्रेत्यांकडुन खरेदी केली होती. सदर औषधांची खरेदी बीले उपकोषागार कार्यालय, कागल येथे मंजुरीसाठी पाठविणेत आली होती. ग्रामीण रूग्णालय, मुरगूड यांनी स्थानिक रित्या खरेदी केलेल्या औषधांची बीले मंजुर करणेसाठी उपकोषागार कार्यालय, कागल येथील उपकोषागार अधिकारी श्री. कुलकर्णी यांनी २०००/- रू. लाचेची मागणी केलेबाबत तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारीप्रमाणे सापळा कारवाई आयोजित केली असता, दिनांक ०८/०२/२०२१ रोजी तहसील कार्यालय, कागल येथील उपकोषागार कार्यालय येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष उपकोषागार अधिकारी यांनी ग्रामीण रूग्णालयामार्फत सादर करण्यात आलेली बीले मंजुर करणेसाठी तक्रारदार यांचेकडे २०००/- रू. लाचेची मागणी करून ती लाच स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक मिलींद मधुकर कुलकर्णी, वय ५५, उपकोषागार अधिकारी, ता. कागल, जि. कोल्हापूर, वर्ग - २, रा. प्लॉट नं. ६९, अरूणोदय को. ऑप सोसायटी, शाहु पार्क, राजेंद्र नगर, कोल्हापूर यांचेविरूध्द कागल पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. सुहास नाडगौंडा, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सफौ. संजीव बंबरगेकर, पोना कृष्णात पाटील, पोकॉ संदीप पडवळ, मयुर देसाई, रूपेश माने व चालक पोहेकॉ विष्णु गुरव, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.